


# वचनि लेखनीहि मराठी गिरा दिसो
# सतत महाराष्ट्रधर्म मर्म मनिं वसो

# नमस्कार मंडळी !
# प्रस्तुत करीत आहोत ...

## मराठी भाषिक मंडळ, टोरांटो (कॅनडा)च्या चारदशकपूर्ती निमित्त
## अर्थात् चाळिशीच्या उंबरठयावरून सिंहावलोकन -

### उत्तर अमेरिकेतील एका प्रगल्भ मंडळाचा मराठी बाणा !
### मायबोलीशी नातं सांगणाऱ्या टोरांटो मराठी भाषिक मंडळाच्या पाऊलखुणा !



| वर्ष | पाऊलखुणा | पुढाकार |
|---|---|---|
| १९६३ | टोरांटोच्या ३५–४० मराठी लोकांनी एकत्र येऊन प्रथम दिवाळी साजरी केली | .. |
| १९६६ | पहिले सामुदायिक गणेश पूजन | .. |
| १९६८ | टोरांटो व जवळपासच्या मराठी लोकांना एकत्र आणावे या हेतुने विचारविनिमयासाठी पहिली सभा. मंडळाची अनौपचारिक सुरवात. | भास्कर देवधर |
| १९६९ | स्थानिक मंडळींनी बसविलेले संपूर्ण तीन अंकी नाटक – अंमलदार | .. |
| १९७० | o मराठी भाषिक मंडळाची औपचारिक स्थापना करण्यासाठी विचारमंथनाची बैठक<br>o सरकारमान्यता मिळवून धार्मिक विधि करणारे पहिले मराठी पुरोहित – नाना टेंबे | ..<br>.. |
| १९७१ | o मराठी भाषिक मंडळाची पहिली वार्षिक कार्यकारिणी (पहिले अध्यक्ष – केशव टिळक)<br>o एअर इंडियाच्या कलाकारांनी सादर केलेली दोन नाटके – खून पहावा करून व तुझे आहे तुजपाशी | ..<br>.. |
| १९७२ | मंडळाच्या "स्नेहबंध" वार्तापत्राची सुरवात | .. |
| १९७४ | मंडळाची घटना अंमलात आली (डिसेंबर महिन्यात) | .. |
| १९७५ | o वासंतिक कार्यक्रम व महिलांसाठी हळदीकुंकू यांची सुरवात<br>o स्त्रियांनी बसवलेले नाटक "बायकात पुरुष लांबोडा"<br>o "स्नेहबंध"चा पहिला दिवाळी अंक | शरश्चंद्र कावळे<br>मंगला जुन्नरकर<br>अशोक पांगारकर |
| १९७७ | o मराठी शाळेचा श्रीगणेशा | श्रीराम मुळगुंद |
| १९७८ | Dr.Bhausaheb Ubale honored as the first Ontario Human Rights Commissioner | .. |
| १९७९ | o "एकता" या त्रैमासिकाच्या प्रसिद्धीला सुरवात<br>o मंडळाच्या ब्रिज क्लबची सुरवात<br>o मंडळाचा Sports Day – वेगवेगळ्या खेळांच्या स्पर्धा | विनायक गोखले<br>श्रीराम मुळगुंद<br>कार्यकारिणी |
| १९८१ | o मंडळाच्या घटनेत बदल – सल्लागार समिती अस्तित्वात आली | .. |
| १९८२ | चित्रपट महोत्सव (सात मराठी चित्रपट) – मराठी चित्रपट सृष्टीची ५० वर्षे साजरी करण्यासाठी महोत्सव साजरा झाला. उपस्थिती सुमारे ५७५ | शरश्चंद्र कावळे |
| १९८३ | o मंडळाच्या आर्थिक उन्नतीसाठी Canada Savings Bonds विकण्याची मोहीम | श्रीराम मुळगुंद |

| वर्ष | पाऊलखुणा | पुढाकार |
|---|---|---|
| | o मराठी समाजासाठी केलेल्या कार्यासाठी मानपत्र देण्यास सुरवात | .. |
| १९८४ | Mandal was incorporated with the Province of Ontario | काशीनाथ घाणेकर |
| १९८५ | o बृहन्महाराष्ट्र मंडळ (उत्तर अमेरिका) चे दुसरे अधिवेशन. उपस्थिती सुमारे ८००. | श्रीराम मुळगुंद (संयोजक) |
| १९८६ | o वनिता मंडळाची स्थापना<br>o आशा पावगी यांच्या सूचनेवरून युवा शिबिराची सुरवात<br>o युवापिढीच्या शैक्षणिक, सांस्कृतिक , सामाजिक व क्रीडाक्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीच्या गौरवासाठी Youth Encouragement Fund ची स्थापना | सिंधू साने<br>..<br>.. |
| १९८७ | o श्रीराम मुळगुंद यांची बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष म्हणून निवड (१९८७ ते १९९१). बृहन्महाराष्ट्र मंडळाची नवी घटना व नवे स्थापत्य यात मोठा सहभाग.<br>o युवा प्रतिनिधीच्या निवडणुकीला सुरवात (पहिली युवा प्रतिनिधी – सोनाली बापट<br>o मुलांसाठी Career Day.<br>o युवांनी सादर केलेले तीन अंकी नाटक (प्रेमाच्या गावा जावे) | ..<br>..<br>श्रीराम मुळगुंद व सुधना रानडे<br>शालन खांडेकर, लीना घाणेकर व सुधना रानडे |
| १९८८ | पुरुषांनी ५५० लोकांसाठी दिवाळीच्या कार्यक्रमासाठी जेवण स्वतः तयार केले | श्रीराम मुळगुंद, मदन टुमणे व शशी जोशी |
| १९८९ | o Mandal was granted the Registered Charitable Organization status, permitting Mandal to issue tax receipts for donations.<br>o सर्व स्त्रिया असलेली मंडळाची कार्यकारिणी<br>o नाव्यमहोत्सव / कलामहोत्सव करण्यास सुरवात<br>o फेब्रुवारी महिन्यात व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यास सुरवात<br>o डेट्रॉइट येथील बृ.म.मंडळाच्या अधिवेशनात पुस्तक प्रदर्शन व विक्री<br>o दुसऱ्या पिढीतील युवक सुदित रानडे याने सादर केलेली संगीत मैफल<br>o Creation of new membership database system to cater for Mandal's needs | काशीनाथ घाणेकर व श्रीराम मुळगुंद<br>शालन खांडेकर<br>शालन खांडेकर व श्रीकृष्ण जोशी<br>सरिता व अजित कुकडे<br>आशा पावगी व पुस्तक प्रदर्शन समिती<br>..<br>शालन खांडेकर, श्रीराम मुळगुंद व दामोदर गोडसे |
| १९९० | o कॅनडा डे परेडमधे मराठी मंडळाचे लेझीम पथक नेण्यास सुरवात<br>o वार्षिक साहित्य संमेलनास सुरवात<br>o वार्षिक संगीत संमेलनास सुरवात | सरिता कुकडे<br>मधुसूदन भिडे<br>सरिता व अजित कुकडे |
| १९९१ | योगासनांच्या वर्गास सुरवात | शशीकांत करंदीकर |

| वर्ष | पाऊलखुणा | पुढाकार |
|---|---|---|
| १९९२ | o मंडळाच्या वास्तूसाठी प्रयत्न (समितीची स्थापना, विचारविनिमय, पैसाउभारणीचे प्रयत्न व अहवाल)<br>o प्रतिभा व विश्वास वैद्य यांच्यातर्फे विक्रम पारितोषिक देण्यास सुरवात | श्रीराम मुळगुंद<br><br>.. |
| १९९३ | o मंडळाचे रौप्यमहोत्सवी वर्ष धूमधडाक्यात साजरे<br><br><br>o आरोग्य व उपचार यावर माहितीपूर्ण भाषण मालिका | सर्व माजी अध्यक्ष (समिती अध्यक्ष गंगाधर देशपांडे)<br>अर्चना बापट |
| १९९५ | o मंडळाची भावी दिशा काय असावी हे ठरविण्यासाठी Vision 2000 समितीचा अहवाल व त्यावर सर्वसाधारण सभेत चर्चा<br><br>o नव्या पिढीच्या अधिपत्याखाली मंडळाचा कारभार (अध्यक्ष – नितीन खांडेकर, सचिव – नितीन मनोहर, खजिनदार – धनू ओगले) | श्रीराम मुळगुंद (समिती अध्यक्ष)<br><br>.. |
| १९९६ | o बृ.म.मंडळाचे युवांचे मैत्र अधिवेशन टोरांटोत साजरे. उपस्थिती सुमारे ५०० <br>o मंडळाचे Policies and Procedures Manual तयार केले | नितीन खांडेकर<br>आनंद मनोहर, सुनंदा टुमणे व सविता जुन्नरकर |
| १९९८ | o मंडळाच्या E-Patra चा प्रारंभ<br>o मंडळाची वार्षिक Membership Directory प्रसिध्द करण्यास सुरवात<br><br><br>o कोजागिरी पौर्णिमेच्या कार्यक्रमास सुरवात<br>o गणेशभक्तांसाठी गणेशयाग परिवाराची स्थापना व कार्यारंभ | प्रसाद गोखले<br>विनायक गोखले, श्रीराम मुळगुंद व काशीनाथ घाणेकर<br>कार्यकारिणी<br>.. |
| १९९९ | मंडळाची website तयार होऊन वापरात आली | आनंद मनोहर |
| २००० | बारावीतील इंग्रजी विषयात सर्वोच्च गुण मिळविणाऱ्यास दिनकर देशपांडे पारितोषिक (रवी पेंढरकर यांच्या सूचनेनुसार) | .. |
| २००२ | बृ.म.मंडळाच्या रचनेत मूलभूत बदल करण्याच्या हेतूने तयार केलेल्या घटना समितीवर श्रीराम मुळगुंद यांची अध्यक्ष म्हणून नेमणुक (अहवाल ऑक्टोबर महिन्यात सादर झाला) | .. |
| २००३ | o बृ.म.मंडळाच्या कार्यकारिणीवर सचिव म्हणून अजित बापट यांची निवड<br>o Panorama India आयोजित कार्यक्रमात मंडळाचे सभासदत्व व कलाकारांचे महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व | ..<br>सुवर्णा कुलकर्णी |
| २००५ | o ज्येष्ठ सभासदांसाठी “स्वानंद” या अनौपचारिक मंडळाची सुरवात<br>o व्यावसायिक मार्गदर्शनासाठी “हितगुज" तर्फे शिबिरांची सुरवात<br><br>o बृ.म.मंडळाच्या अटलांटा येथे भरलेल्या अधिवेशनात मराठी भाषिक मंडळाला “उत्तर अमेरिकेतील उत्तम प्रकारे चालविले गेलेले मंडळ” असे मानपत्र | अपर्णा गंगाखेडकर<br>प्रशांत देसाई व आशिष केमकर<br><br>.. |

| वर्ष | पाऊलखुणा | पुढाकार |
|---|---|---|
| | o ‘ सप्तरंग’ या मराठी कार्यक्रमाची सुरवात (दर शनिवारी सकाळी अर्धा तास) Radio Frequency: FM 101.3 (in Toronto), Live on Internet: http://www.cmr.fm | मीना व रवि जातेगावकर |
| २००७ | o विनता कुलकर्णी यांची बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या संपादिका म्हणून नेमणुक | .. |
| | o कोजागिरीच्या कार्यक्रमासाठी पुरुषांनी २७५ लोकांसाठी चमचमीत पावभाजी व स्नॅक्स स्वतः तयार केले | विजय रत्नपारखे, अरविंद कुलकर्णी, हरीष आठले |
| | o बृ.म.मंडळाच्या Talent Transfer या प्रकल्पाखाली उत्तर विभागासाठी प्रतिनिधी म्हणून मिलिंद करंदीकर यांची नेमणुक | .. |
| | o बृ.म.मंडळाच्या उत्तर विभागाच्या एकांकिका स्पर्धांचे आयोजन | मिलिंद करंदीकर |
| २००८ | o साहित्यिक गप्पागोष्टी करता याव्यात या हेतूने साहित्य मंडळाची अनौपचारिक स्थापना | स्मिता भागवत व विनता कुलकर्णी |
| | o मंडळाच्या वार्षिक साहित्य संमेलनातील सर्वोत्कृष्ट कवितेला “इंदुमति जोशी पारितोषिक” वीणा व विष्णु जोशी यांच्यातर्फे देण्यास सुरवात | .. |
| | o First summit of NAME (North American Maharashtrian Entrepreneurs) under the auspices of BMM held in Toronto (Attended by 70 delegates and invitees from Canada, U.S. and India) | विनता कुलकर्णी |
| | o मंडळाच्या घटनेत बदल करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल सर्वसाधारण सभेपुढे सादर. घटनेतील बदल मंजूर | घटना समीक्षण समिती |
| | o नव्या पिढीतील युवांनी सादर केलेली संगीत मैफिल (रवी दातार, समिधा जोगळेकर व अनुजा पंडितराव) | आमोद केळकर |
| | o मंडळाच्या चार दशक पूर्तीनिमित्त कार्यक्रम | अजित कुकडे |
| | o मंडळाच्या ४० वर्षांच्या वाटचालीवर आधारित Digital Audio and Video लघुचित्रपट | विनता कुलकर्णी व संदीप मनोहर |

**तर मंडळी – तुमच्या आमच्यातल्या काही ध्येयवेड्या मराठमोळ्यांनी मराठी माती आणि संस्कृतीच्या निष्ठेने ४० वर्षांपूर्वी टोरांटो (कॅनडा) येथे लावलेले मराठी भाषिक मंडळाचे इवलेसे रोप- आता प्रचंड वृक्ष झाला आहे.**
**वृक्षाची रसाळ फळे चाखत, नवनवीन प्रकल्पांचे बीज पेरले जात आहे.**
**यापुढेही मंडळातील कार्यकर्ते, उद्योजक/व्यावसायिक, साहित्यिक व कलाप्रेमी मंडळी पाश्चिमात्य समाजात मिसळून मराठी अस्मिता व भारतीय संस्कृती यांची निश्चितच जोपासना करतील.**
**कारण त्यामागे आहे एकच प्रेरणा, ध्यास, अन् ध्येय -**

## ज्ञानदेवे रचिला पाया
## तयाचा कळस गगनीं भिडवुया !

## संकल्पना/निर्मिती

विनता कुलकर्णी

(Vinata Kulkarni)

## संदर्भ संकलन व लेखन

विनता कुलकर्णी, श्रीराम मुळगुंद, काशीनाथ घाणेकर,

(Vinata Kulkarni, Shriram Mulgund, Kashinath Ghanekar)

## ध्वनी

अश्विनी देवधर, अमित देवधर

(Ashwini Deodhar, Amit Deodhar)

## तांत्रिक सादरीकरण

संदीप मनोहर

(Sandeep Manohar)

**(Above is a text part of Audio /Video Short Digital Film displayed on 15th Nov 2008, at the MBM Diwali program)**

**© 2008**

MBM Toronto Inc.